महाराष्ट्र शासन
विभागीय शिक्षणउपसंचालक नागपूर विभाग, नागपूर
बालभारती, एन.आय.टी. गार्डन समोर, धंतोली, नागपूर.
Website :www.dydenagpur.org.
दुरध्वनीक्रमांक 0712-2411318, E-mail:dydnagpur@rediffmail.com, dd.nagpur@mahedu.gov.in

क्रमांक शिउसं/माध्य-अ/प्रथमखातेमान्यता/ 1797866 /2025 दिनांकः- 16-10-2025

प्रति,
अध्यक्ष/सचिव
इश कृपा सोसायटी ऑफ इ पुर सवेंट, नागपूर

विषय :-प्रथम खाते मान्यता मिळण्याबाबत
**इश कृपा सोसायटी ऑफ इ पुर सवेंट, नागपूर द्वारा संचालित डिवाईन प्रोव्हीडेंस स्कूल, पाद्री ठाणा, बुटीबोरी , उमरेड रोड, नागपूर (सीबीएसई , इंग्रजी माध्यम)**
(इंग्रजी - माध्यम, इ.1 ते 10 वी , सीबीएसई)

संदर्भः- 1)मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. NOC-208/(31/08)/SE-1 दिनांक 02 जून, 2008
2)या कार्यालयाचे पत्रक्रमांक माध्य व/स्वअर्थ/6615/2019 दिनांक 09.08.2019
3)शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र.जिपना/शिक्षण/माध्य/कार्या/4/4628/2025 दि.18.07.2025

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना/विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत **इश कृपा सोसायटी ऑफ इ पुर सवेंट, नागपूर द्वारा संचालित डिवाईन प्रोव्हीडेंस स्कूल, पाद्री ठाणा, बुटीबोरी , उमरेड रोड, नागपूर (सीबीएसई , इंग्रजी माध्यम)** या शाळेस दर्जावाढ (इंग्रजी - माध्यम, इ.1 ते 10 वी , सीबीएसई मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. NOC-208/(31/08)/SE-1 दिनांक 02 जून, 2008 अन्वये शासनाने शैक्षणिक व 2008-09 पासून परवानगी दिलेली आहे. त्यानूसार सदरची परवानगी या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिक्षण/माध्य/कार्या/4/4628/2025 दि.18.07.2025अन्वये संस्थेस कळविलेली आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचे संदर्भिय क्र.3 चे पत्रान्वये शिफारसीसह शाळेला इयत्ता 9 ते 10 ला खात्याची प्रथम मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**अटी व शर्ती**

1. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
2. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा(स्थापना व विनियम) मुख्य अधिनियम 2013 मधील सर्व तरतुदीचे पालनकरणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

4. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर स्वंयअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.
5. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्यठिकाणी स्थलांतरकरता येणार नाही.
6. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE मध्ये माहिती भरतांना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

तसेच शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलवजावणी करणे बंधणकारक राहील.

तरी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. ~~वर्धा~~ नागपूर यांची शिफारस विचारात घेता आरटीई नियमांतील तरतूदी व माध्यमिक शाळा संहिता नियमातील तरतूदीच्या अधिन राहून व उपरोक्त अटी व शर्ती नूसार **इश कृपा सोसायटी ऑफ इ पुर सर्वेंट, नागपूर द्वारा संचालित डिवाईन प्रोव्हीडेंस स्कूल, पाद्री ठाणा, बुटीबोरी , उमरेड रोड, नागपूर (सीबीएसई , इंग्रजी माध्यम) (स्वंयअर्थसहाय्यित)** , या शाळेस इयत्ता 9 ते 10 ला **खात्याची प्रथम मान्यता** प्रदान करण्यात येत आहे.

Signed by Madhuri Govindrao Sawarkar
Date: 16-10-2025 07:59:04

**(डॉ.माधुरी सावरकर)**
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग नागपूर**

**प्रतिलीपी**

1) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ, नागपूर यांना माहितीकरीता समादराने अग्रेषित.
2) शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती तथा पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेवावत विचार करावा.
3) मुख्याध्यापक **डिवाईन प्रोव्हीडेंस स्कूल, पाद्री ठाणा, बुटीबोरी , उमरेड रोड, नागपूर** यांना माहितीकरीता अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner